## जाहिर नोटीस

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले नाशिक महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र नाशिक महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टि.डी.आर.) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदर मिळकत निर्बंध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी नाशिक महानगरपालिकेस दिलेला आहे.

खालील नमुद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमिन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न,वस्त्र,गहाण, दान,बक्षिस,खरेदी,पोटगी,लिज-लिन,चार्ज,इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधीताने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत उप संचालक नगररचना, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका,राजीव गांधी भवन,शरणपुर रोड,नाशिक-४२२००२ यांचे कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त न झाल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजुन किंवा असल्यास संबंधीताने तो जाणून बुजून सोडून दिला आहे असे समजुन नाशिक महानगरपालिका सदरची आरक्षणाखालील जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि.डी.आर.च्या स्वरुपात खालील जमिन मालकास अदा केला जाईल त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१) **मिळकतीचे वर्णन**

| | |
|---|---|
| जमिन मालकाचे नाव | :- ताराचंद देवीसहाय गुप्ता |
| शिवार | :- नाशिक |
| स.नं./सि.स.नं./गट नं. | :- ३१२/२ |
| ७/१२ उताऱ्यानुसार जमिनीचे क्षेत्र | :- ५३००.०० चौ.मी. |
| आरक्षणाखालील क्षेत्र | :- ५३००.०० चौ.मी. |
| मंजुर विकास योजनेनुसार आरक्षणाचे प्रयोजन | :- पार्किंग, फायरब्रिगेड स्टेशन (आरक्षण क्रमांक-१६०) |

चतु:सिमा खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| पुर्व बाजुस | :- १८ मी. विकास योजना रस्ता. |
| पश्चिम बाजुस | :- स.नं.३१२ मधील उर्वरित आरक्षण. |
| दक्षिण बाजुस | :- १८ मी. विकास योजना रस्ता. |
| उत्तर बाजुस | :- स.नं.३१२ मधील उर्वरित रहिवास क्षेत्र. |

वरीलप्रमाणे नाशिक महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र नाशिक महानगरपालिका उक्त नमूद जमिन मालकांकडून हस्तांतरणीय विकास हक्काचे मोबदल्याव्दारे ताब्यात घेत असल्याने उक्त जमिन मालकांशिवाय अन्य कोणाचाही सदर क्षेत्राशी कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची लेखी हरकत वर नमूद पत्त्यावर दिनांक 0४ /0५ /२०१८ अखेर सादर करावी.

सदर जाहिर नोटीस नाशिक महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nashikcorporation.in येथे देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

उप संचालक,नगररचना (प्र.)
नाशिक महानगरपालिका,नाशिक